# सायबर क्राईम सेलने गेले दोन वर्षात रिफंड केले रुपये साठ लाख

१. नमस्कार सर , आज सकाळी मी ऑफीसला जायला निघालो असता मला एक फोन आला व त्यांनी मला सांगितले की ते माझी बँक एसबीआय मधुन बोलत असून माझे अकाऊंटची अपडेट माहिती व सर्व कॉन्टॅक्टची सर्व माहिती अपडेट करुन देणार, त्यासाठी तुमच्याकडील असलेले डेबीट अथवा क्रेडीट कार्ड डिटेल्स दयावे लागतील मी लगेच तुमचे कार्ड अपडेट करुन देतो असे सांगितले. त्यानंतर मी फोनवरील इसमाला माझेकडील असलेल्या डेबीट/क्रेडीट कार्डच्या डिटेल्स जसे कार्ड नंबर व कार्ड च्या मागच्या सीव्हीव्ही नंबर दिला. काही मिनीटांनी माझे मोबाईल नंबरवर बँकेकडून मेसेज प्राप्त झाला. माझे अकाऊंट मधून मोबिक्वीक यां मर्चंटव्दारे ७ वेळा वेगवेगळया रक्कमेचे ट्रान्झेक्शन करुन एकुण रु. रु.१,९९,९९०/- फसवणुक करुन काढून घेतले. मी पुन्हा त्या फोन वर फोन केला असता सदर इसमाने माझ्याशी अवार्च व अश्लिल भाषेत संभाषण केले. त्यावरुन माझी आर्थिक फसवणूक झाली असल्याचे मला समजले. मी तात्काळ सायबर क्राईम सेलकडे धाव घेतली. सायबर क्राईम सेल पोलीसांनी तात्काळ मोबिक्वीक मर्चंटला फिर्यादी यांचे पेमेंट स्टॉप करण्यासाठी ईमेल केला व मर्चंटला फोन केला असता, मोबिक्वीक मर्चंटने फिर्यादी यांचे रु.७६,७०१/- हे रिफंड केले.

२. नमस्कार सर , आज सकाळी मी माझे घरी दैनंदिन कामामध्ये असताना मला एक फोन आला व त्यांनी मला सांगितले की ते माझी बँक ऑफ बडोदा मधुन बोलत असून मला माझे क्रेडिट कार्डची रिवॉर्ड पॉईंट रु.५,०००/- मिळण्याचे अमिष दाखवून व ते तात्काळ माझे अकाऊंटला डिपॉझिट करणार असे सांगून, माझेशी गोड बोलून, त्यासाठी तुमच्याकडील असलेले डेबीट अथवा क्रेडीट कार्ड डिटेल्स दयावे लागतील व मी लगेच तुमचे रिवॉर्ड पॉईंट तुमचे अकाऊंटला डिपॉझिट करुन देतो असे सांगितले. त्यानंतर मी फोनवरील इसमाला माझेकडील असलेल्या डेबीट/क्रेडीट कार्डच्या डिटेल्स जसे कार्ड नंबर व कार्ड च्या मागच्या सीव्हीव्ही नंबर दिला. त्यानंतर माझे वैयक्ती वापरावयाच्या मोबाईलवर मला एक ओटीपी आला तो देखील मी शेअर केला व काही मिनीटांनी माझे मोबाईल नंबरवर बँकेकडून मेसेज प्राप्त झाला. माझे अकाऊंट मधून रक्कम रु.४९,०००/- फसवणुक करुन काढून घेतली, सदरचे ट्रान्झेक्शन हे The Legal Head, Mpesa, Book My Show, Idea Money या मर्चंटला झालेले होते. मी तात्काळ सायबर क्राईम सेल कडे येऊन सदरबाबत माहिती दिली असता, सायबर क्राईम सेल पोलीसांनी The Legal Head, Mpesa, Book My Show, Idea Money तात्काळ ईमेलव्दारे पत्रव्यवहार केला, असता The Legal Head Mpesa यांचेकडून रु.१९७००/- रिफंड करणेत आले.

अशाप्रकारे सायबर क्राईमकडे तक्रारी आल्यावर सायबर क्राईम सेलकडून ज्या मर्चंटला पैसे गेले असतील त्यांना ईमेल करुन, सदरचा व्यवहार हा फसवणुकीचा असल्याने, ते पैसे आहे तसे रोखण्यास सूचना दिल्या जातात. कोणताहि व्यवहार पूर्ण होण्यासाठी म्हणजेच अर्जदाराकडून मर्चंटकडे व मर्चंटकडून विक्रेत्याकडे पैसे जाण्यासाठी काही कालावधी लागतो. यादरम्यान अर्जदार यांनी सायबर सेल येथे संपर्क साधल्यास व्यवहार त्वरीत थांबविता येऊन पैसे परत मिळवून देण्यास मदत होते. अशाप्रकारे फसवणुक करणारी व्यक्ती हि महाराष्ट्रा बाहेरिल असते, आणि पैसे खर्च झाल्यावर त्याचेकडून परत जप्त करणे अवघड होते. जर अर्जदार दोन ते चार तासांचे दरम्यान सायबर सेलकडे आल्यास त्यांचे फसवणुकीने गेलेली रक्कम मिळून देणे सोपे होते.

तसेच सायबर क्राईम सेलच्यावतीने सर्व मोबाईल नोडल बँक, मर्चंट/वॉलेट, एनपीसीआय, दुरसंचार विभाग(डीओटी) यांचे अधिकारी यांची कार्यशाळा घेण्यात आली असून, सदर प्रक्रिया जलद/सुरळीत करण्यासाठी संयुक्तीकपणे एक ग्रुप/गट अयोजित करुन याविषयावर भर देणार आहोत.

गेले दोन वर्षामध्ये खालीलप्रमाणे रक्कम मिळवून देण्यास सायबर क्राईम सेलला यश आले आहे.

**सन २०१६ व सन २०१७ या कालावधीमध्ये सायबर क्राईम सेलकडून रिफंड करण्यात आले रक्कमेची व अर्जाची आकडेवारी**

| अ.क्र. | सन | रिफंड केलेले अर्जाची संख्या | रिफंड झालेली रक्कम |
|---|---|---|---|
| | | सन २०१६ | |
| १ | सन २०१६ | ६६ | २३,५७,०९२/- |
| | | सन २०१७ | |
| १ | जानेवारी | १७ | ६,३२,६९८/- |
| २ | फेब्रु | ०७ | १,०७,७००/- |
| ३ | मार्च | ०७ | १,०७,७०६/- |
| ४ | एप्रिल | ०९ | ४,२४,८०५/- |
| ५ | मे | ०३ | ५४,०१०/- |
| ६ | जून | १६ | २,३५,७६९/- |
| ७ | जुलै | ०९ | २६,४६,४७०/- |
| ८ | ऑगस्ट | २८ | १२,९३,४७८/- |
| ९ | सप्टेंबर | २७ | ५,२२,३२६/- |
| | एकुण | १२३ | ६०,२४,९६२/- |

- **तरी, याव्दारे अवाहन करण्यात येते की, अशाप्रकारे फसवणुकीने पैसे गेल्यास त्वरीत सायबर क्राईम सेलशी संपर्क साधावा.**
- **फोन नं.०२०-२६१२३३४६**

Shiremath.

(सुधीर हिरेमठ)
पोलीस उप-आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर